**फौ. कि. अर्ज क्र. ३१२/२०२५**

**सत्यापण**

मी शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव** – **नामदेव गोविंद कणसे,**

**वय** – ४३ वर्षे, **व्यवसाय** – सरकारी नोकरी,

**पत्ता** – विजयनगर, सांगली

गैरअर्जदार अश्विनी कणसे ही माझी पत्नी आहे. दि. ३०.०४.२०२४ रोजी सायंकाळी ०६.३० वाजण्याच्या सुमारास राममंदिर येथील सिरवी मिठाई बंधू यांचे दुकानात मी नाष्टा करत असताना सदरील घटना घडली. त्यावेळी अचानकपणे तेथे गैरअर्जदार या मुलींसोबत आल्या. गैरअर्जदार यांनी माझ्या नाष्ट्याच्या प्लेटवर हात मारल्या. गैरअर्जदार यांनी माझ्याकडे मुलींच्या शालेय शिक्षणाच्या खर्चाकामी पैशाची मागणी केली. मी त्यांना आता माझ्याकडे पैसे नाहीत, माझे बँकेचे हप्ते चालू आहेत, माझ्याकडे पैसे आल्यानंतर तुला पैसे देईन, असे सांगितले. सदरील बोलणे ऐकून त्यांनी माझी गळपट पकडली व मला शिवीगाळ केली. तसेच मला त्यांनी लाथाबुक्क्यांनी देखील मारहाण केली. त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिली.

मी सदर प्रकाराबाबत पोलीस स्टेशन विश्रामबाग येथे त्याच दिवशी तक्रार दिली. सदरील तक्रारीवरून पोलिसांनी पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा क्र. २४७/२०२३ दाखल करून घेतला. पोलिसांनी पुढील कारवाई न केल्याने मी प्रस्तुतची

तक्रार न्यायालयात दाखल केली आहे.

फिर्यादी/साक्षीदाराची सही

(नामदेव गोविंद कणसे)

श्रवणोत्तर स्वीकृत,

29/09/25

**(रोहिणी सं. पाटील)**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र. १)**

**सांगली.**

ठिकाण–सांगली

दिनांक–२९/०९/२०२५